# बृहन्मुंबई महानगरपालिका (शिक्षण विभाग)

## सीबीएसई/आयसीएसई मंडळ शाळा कक्ष

शिक्षणाधिकारी यांचे मुख्य कार्यालय, त्रिवेणी संगम मनपा शाळा इमारत, करी रोड, मुंबई ४०००१२

### शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी मुंबई पब्लिक स्कूल (सीबीएसई/आयसीएसई/ आयजीसीएसई /आयबी) मंडळाच्या शाळेतील प्रवेश प्रक्रियेबाबत पालकांसाठी आवश्यक सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत मुंबई पब्लिक स्कूल सीबीएसई/आयसीएसई/आयजीसीएसई व आयबी मंडळ अभ्यासक्रमाच्या शाळांमध्ये प्रति वर्षी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असते. या अनुषंगाने सद्यस्थितीत सुरू असणा-या १४ सीबीएसई व आयसीएसई, आयजीसीएसई व आयबी मंडळाची प्रत्येकी ०१ अशा एकूण १७ शाळा व सन २०२४-२५ मध्ये नव्याने सुरु होणा-या सीबीएसई मंडळाच्या ०५ अशा एकूण २२ शाळांमध्ये नर्सरीच्या व अन्य वर्गातील तुकडीसाठी मान. महापौर यांच्या शिफारसीच्या १०% व मनपा कर्मचारी यांच्या ५ % राखीव असणा-या जागा वगळून उर्वरित जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया दिनांक ०१/०१/२०२४ पासून १५/०१/२०२४ पर्यंतच्या कालावधीत खालीलप्रमाणे राबविण्यात येणार आहे.

प्रथम टप्पा-: प्रवेश अर्ज भरणे

फक्त संगणकीय प्रणालीद्वारे प्रवेश अर्ज स्विकारण्यात येतील. संगणकीय सुविधा उपलब्ध नसणाऱ्या अर्जदारांसाठी संबंधीत शाळांमध्ये मदत कक्ष स्थापन करण्यात येतील. दिनांक ०१ जानेवारी २०२४ ते १५ जानेवारी २०२४ दरम्यान सकाळी १०.३० ते संध्याकाळी ४.३० सोमवार ते शनिवार या वेळेत संबंधित शाळेच्या मदत कक्षात ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता मदतीसाठी शालेय कर्मचारी उपलब्ध असतील. प्रवेशासाठी शाळा खालीलप्रमाणे आहेत सोबत रिक्त जागांचा तपशिल तक्ता “अ” मध्ये देण्यात आला आहे.

| अ.क्र | शाळेचे नाव | मंडळ | विभाग | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई पब्लिक स्कूल चिकूवाडी,बोरीवली | सीबीएसई | आर मध्य | २०२१-२२ |
| २ | मुंबई पब्लिक स्कूल जनकल्याण नगर ,मालाड | सीबीएसई | पी उत्तर | २०२१-२२ |
| ३ | मुंबई पब्लिक स्कूल प्रतीक्षा नगर, जोगेश्वरी | सीबीएसई | के पश्चिम | २०२१-२२ |
| ४ | मुंबई पब्लिक स्कूल मीठागर, मुलुंड | सीबीएसई | टी | २०२१-२२ |
| ५ | मुंबई पब्लिक स्कूल हरियाली विलेज, विक्रोळी | सीबीएसई | एस | २०२१-२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मुंबई पब्लिक स्कूल राजावाडी, घाटकोपर | सीबीएसई | एन | २०२१-२२ |
| ७ | मुंबई पब्लिक स्कूल अजिज बाग, चेंबूर | सीबीएसई | एम पूर्व २ | २०२१-२२ |
| ८ | मुंबई पब्लिक स्कूल तुंगा विलेज, पवई | सीबीएसई | एल | २०२१-२२ |
| ९ | मुंबई पब्लिक स्कूल भवानी शंकर,दादर | सीबीएसई | जी उत्तर | २०२१-२२ |
| १० | मुंबई पब्लिक स्कूल काणे नगर, सायन | सीबीएसई | एफ उत्तर | २०२१-२२ |
| ११ | मुंबई पब्लिक स्कूल पूनम नगर , अंधेरी(पूर्व) | सीबीएसई | के पूर्व | २०२०-२१ |
| १२ | मुंबई पब्लिक स्कूल वूलन मिल, माहीम | आयसीएसई | जी उत्तर | २०२०-२१ |
| १३. | मुंबई पब्लिक स्कूल एल.के,वाघजी ,माटुंगा | केंब्रिज | एफ उत्तर | २०२२-२३ |
| १४. | मुंबई पब्लिक स्कूल विलेपार्ले. (पूर्व) | आयबी | के पूर्व | २०२२-२३ |
| १५. | मुंबई पब्लिक स्कूल जिजामाता नगर | सीबीएसई | एम/प | २०२३-२४ |
| १६ | मुंबई पब्लिक स्कूल आशिष तलाव(वडवली) | सीबीएसई | एम/पूर्व-२ | २०२३-२४ |
| १७ | मुंबई पब्लिक स्कूल एम.जी क्रॉस रोड क्र.१ | सीबीएसई | आर/द | २०२३-२४ |
| १८ | मुंबई पब्लिक स्कूल बोरा बझार | सीबीएसई | ए | २०२४-२५ |
| १९ | मुंबई पब्लिक स्कूल शांती नगर | सीबीएसई | जी/द | २०२४-२५ |
| २० | मुंबई पब्लिक स्कूल नटवरलाल पारेख कंपाऊंड | सीबीएसई | एम/ई-१ | २०२४-२५ |
| २१ | मुंबई पब्लिक स्कूल मालवणी टाऊनशिप,मालाड | सीबीएसई | पी/उत्तर | २०२४-२५ |
| २२ | मुंबई पब्लिक स्कूल वीर सावरकर मार्ग वर्षा नगर | सीबीएसई | एस | २०२४-२५ |

द्वितीय टप्पा -:अर्ज छाननी

स्विकृत अर्जाच्या यादीतील पाल्यांच्या पालकांना कागदपत्रे छाननी आणि समुपदेशन सत्रासाठी शाळेत बोलाविण्यात येईल. छाननी प्रक्रियेसाठी पालकांनी खालील कागदपत्रांच्या मूळ प्रती घेऊन शाळेत हजर राहणे आवश्यक राहील.

१) पालकांचे आधार कार्ड

२) पाल्याचे जन्म प्रमाणपत्र

३) सध्याच्या निवासी पत्याचा पुरावा (आधारकार्डपेक्षा वेगळा पत्ता असल्यास)

तृतीय टप्पा -: सोडत

सीबीएसई व आयसीएसई मंडळाच्या शाळेत जर नर्सरी वर्गाच्या एका तुकडीसाठी ३४ पेक्षा जास्त विद्यार्थांचे प्रवेश अर्ज प्राप्त झाले तर विद्यार्थांची निवड प्रक्रिया सोडती (लॉटरी) द्वारे करण्यात येईल. सोडतीद्वारे निवड प्रक्रिया राबविण्याची गरज भासल्यास त्याचे वेळापत्रक छाननी प्रक्रीयेनंतर जाहीर करण्यात येईल.

आयबी व आयजीसीएसई मंडळाच्या शाळेत जर नर्सरी वर्गाच्या एका तुकडीसाठी २६ पेक्षा जास्त विद्यार्थांचे प्रवेश अर्ज  प्राप्त झाले तर विद्यार्थांची निवड प्रक्रिया सोडती (लॉटरी) द्वारे करण्यात येईल. सोडतीद्वारे निवड प्रक्रिया राबविण्याची गरज भासल्यास त्याचे वेळापत्रक छाननी प्रक्रीयेनंतर जाहीर करण्यात येईल.

चतुर्थ टप्पा :- प्रवेश निश्चिती

तृतीय टप्पा पूर्ण झाल्यानंतर अंतिम निवड यादी संबंधित शाळांमध्ये प्रदर्शित करण्यात येईल.प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संबंधित पालकांना शाळेत उपस्थित रहावे लागेल.त्याबाबतचे वेळापत्रक सबंधित शाळेद्वारे कळविण्यात येईल.

प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक

| प्रक्रिया | प्रारंभ तारीख | समाप्ती तारीख |
|---|---|---|
| ऑनलाईन अर्ज प्रक्रिया | ०१ जानेवारी २०२४ | १५ जानेवारी २०२४ |
| प्राथमिक कागदपत्र छाननी आणि पालकांचे समुपदेशन सत्र | १० जानेवारी २०२४ | २२ जानेवारी २०२४ |
| सोडत प्रक्रियेसाठी पात्र पाल्यांची यादी प्रदर्शित करणे. | २७ जानेवारी २०२४ | |
| सोडत प्रक्रिया | ३० जानेवारी २०२४ ते ०२ फेब्रुवारी २०२४ | |
| निवड झालेल्या पाल्यांची यादी प्रदर्शित करणे. | ०५ फेब्रुवारी २०२४ | |
| निवड झालेल्या पाल्यांची प्रवेश नोंद प्रक्रिया | अंतिम निवड यादी प्रदर्शित झाल्यापासून २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत | |
| शैक्षणिक सत्राची सुरुवात | एप्रिल२०२४ | |

# प्रवेशाच्या सर्वसाधारण सूचना

१) प्रत्येक टप्प्यावर त्या टप्प्यात निवडलेल्या पाल्यांची यादी शाळेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल आणि तीच यादी शाळा –निहाय आणि वर्ग निहाय व्हॉट्सअॅप ग्रुपवर पालकांना पाठविण्यात येईल.याबाबत नोंद घेण्याचीसंपूर्ण जबाबदारी पालकाची असेल.

२) शाळेपासून ०१ किलोमीटर परिक्षेत्रात राहणा-या विद्यार्थांना प्रवेशासाठी प्रथम प्राधान्य दिले जाईल.

३) नविन शैक्षणिक वर्ष एप्रिल २०२४ पासून सुरू होईल.

४) सीबीएसई/आयसीएसई/आयजीसिएसई/आयबी मंडळाशी संलग्न असणाऱ्या सगळ्या ”मुंबई पब्लिक स्कूल” शाळेमध्ये मराठी विषय हा तृतीय भाषा म्हणून बंधनकारक राहील.

५) शासन निर्णय क्र.प्राशिसं/आरटीई/-५२०/२०२३/४८७ दि.१९/०१/२०२३ अनुसार निर्देशित केल्याप्रमाणे वयोमर्यादेचे निकष बंधनकारक राहतील.

६) अन्य मंडळाच्या शाळेमध्ये नव्याने वर्ग/तुकडी सुरु करण्याकरिता प्रत्येक तुकडीसाठी किमान २० विद्यार्थी आवश्यक असून दोन तुकडीसाठी किमान ६० विद्यार्थी आवश्यक आहेत. जर वर्गासाठी अपेक्षित विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर सदर वर्ग किंवा वर्गतुकडी सुरु करणे शक्य होणार नाही यांची नोंद घ्यावी.

| इयत्ता | किमान जन्मदिनांक | कमाल जन्मदिनांक |
|---|---|---|
| नर्सरी | ०१/०७/२०२० | ३१/१२/२०२१ |
| ज्युनिअर केजी | ०१/०७/२०१९ | ३१/१२/२०२० |
| सिनिअर केजी | ०१/०७/२०१८ | ३१/१२/२०१९ |
| पहिली | ०१/०७/२०१७ | ३१/१२/२०१८ |
| दुसरी | ०१/०७/२०१६ | ३१/१२/२०१७ |
| तिसरी | ०१/०७/२०१५ | ३१/१२/२०१६ |
| चौथी | ०१/०७/२०१४ | ३१/१२/२०१५ |
| पाचवी | ०१/०७/२०१३ | ३१/१२/२०१४ |
| सहावी | ०१/०७/२०१२ | ३१/१२/२०१३ |